# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३.२३०९७१० **E.Mail - pilcbnskr@gmail.com**


---

## प्रेसनोट

दिनांक:- ०५/०४/२०१८

### पत्नीने पतीच्या खुनाची सुपारी देवुन प्रियकर व भावाच्या मदतीने केली पतीची निघृण हत्या
### स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने केला १२ तासात खुनाचा उलगडा

---

दि. ०३ एप्रिल २०१७ रोजी मध्यरात्रीचे सुमारास निफाड तालुक्यातील बोकडदरे शिवारात औरंगाबाद ते नाशिक महामार्गावर एक पुरुष जातीचे अर्धवट जळालेले प्रेत मिळुन आले होते. सदर घटनेबाबत नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो**. व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो** यांनी तात्काळ दखल घेवुन स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास घटनास्थळावर पाचारण केले. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांनी तात्कळ घटनास्थळी धाव घेवुन घटनास्थळाची बारकाईने पाहणी केली. घटनास्थळावर एक ओमनी कार क्र. एम.एच.१५.बी.डब्ल्यु.५८६६ हे वाहन मिळुन आले, सदर वाहनाचे मुळ मालकाबाबत माहिती घेतली असता ओझर मिग परिसरातील चंपालाल वाल्मिक जाट यांचे मालकीची कार असल्याची माहिती मिळाले वरुन सदर प्रेताची ओळख पटविण्यात आली. मयत चंपालाल वाल्मिक जाट यांना कोणीतरी अज्ञात आरोपीतांनी अज्ञात कारणावरुन ज्वलनशील पदार्थ अंगावर टाकुन पेटवुन देवुन जिवे ठार मारले म्हणुन **निफाड पोलीस ठाणेस I गुन्हा रजि. नं. ३३/२०१८ भादवि कलम ३०२** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मा.पोलीस अधीक्षक सो. यांनी सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा शोध घेणेसाठी केलेले मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी तपासाची सुत्रे हाती घेवुन मयत चंपालाल जाट यांचे बाबत सविस्तर माहिती घेतली, तसेच खब-यांचे जाळे पसरावुन मयताचे ओझर येथील नातेवाईक व मित्रमंडळींबाबत गोपनीय माहिती घेतली. त्यावरुन मयत चंपालाल जाट यांची पत्नी निर्मला उर्फ ज्योती हिचे त्यांचे घरी नेहमी येणारा इसम नामे रमेश सोनवणे उर्फ भैय्या याचेशी अनैतिक संबंध असल्याचे समजले, तसेच ०३ एप्रिल २०१८ रोजी रात्रीचे सुमारास रमेश सोनवणे हा मयत चंपालाल जाट यांचे ओमनी व्हॅनमध्ये बसलेला होता अशी खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानुसार स्थागुशाचे पथकाने समतानगर, ओझर येथील **संशयीत इसम नामे १) रमेश साहेबराव सोनवणे, वय २६** यास चौकशीकामी ताब्यात घेतले, त्याचे शरीराची बारकाईने तपासणी केली असता, त्याचे डावे हातास तीक्ष्ण हत्याराने कापल्या सारखी जखम दिसुन आल्याने तपास पथकाचा संशय अधिक बळावला. सदर इसमास विश्वासात घेवुन अतिशय कौशल्याने विचारपुस केली असता, त्याने त्याचे साथीदार नामे **२) आकाश शंकर गांगुर्डे,** वय १९, रा. मुल्लावाडा, ओझर, **३) संजय कारभारी बाविस्कर,** वय ४२, रा. समतानगर, ओझर तसेच मयताची पत्नी हिचा भाउ नामे **४) कैलास भिला पुणेकर,** वय ५५, रा. जेलरोड, नाशिकरोड यांचे मदतीने चंपालाल जाट यांचा खुन केल्याची कबुली दिली आहे.

मयत चंपालाल जाट यांची पत्नी निर्मला उर्फ ज्योती जाट हिचे आरोपी रमेश सोनवणे याचेशी अनैतिक संबंध होते, त्यामुळे त्याचे घरात नेहमी वाद होत असे, व तो पत्नी निर्मला हिस वारंवार त्रास देत असल्याने तिने व तिचा भाउ नामे कैलास पुणेकर यांनी चंपालाल जाट यास जिवे ठार मारण्यासाठी प्रियकर रमेश सोनवणे यास १५ हजार रुपयांची सुपारी दिली होती. परंतु चंपालाल जाट यास मारण्यासाठी प्रियकर रमेश हा एकटा काम करु शकणार नसल्याने त्याने त्याचा मित्र आकाश गांगुर्डे व संजय बाविस्कर यांना प्लॅन सांगितला.

त्याप्रमाणे चंपालाल जाट यास भाडयाने गाडी पाहिजे असे कारण देवुन घरापासुन लांब घेवुन जावुन त्यास जिवे ठार मारायचे व प्रेत जाळुन टाकायचे असे ठरले होते.

दिनांक ०३ एप्रिल २०१८ रोजी मयताचे पत्नीचा प्रियकर रमेश सोनवणे याने त्याचे नातेवाईकांना मनमाड रेल्वे स्टेशन येथे घ्यावयास जाणेसाठी मयत चंपालाल जाट यांची ओमनी व्हॅन भाडयाने ठरवुन रात्री ११:०० वा. ओझर येथुन रमेश सोनवणे, आकाश गांगुर्डे व संजय बाविस्कर असे चंपालाल जाट यांचेसह ओमनी व्हॅनने मनमाड कडे औरंगाबाद नाशिक हायवेने निघाले, मनमाड येथे जावुन रेल्वे उशिरा येणार असल्याचे कारण सांगुन सर्वजण परत ओझरकडे येत असतांना बोकडदरा, ता.निफाड येथे आरोपी रमेश सोनवणे याने लघुशंकेसाठी गाडी थांबविण्यास सांगितली. गाडी थांबल्यानंतर चंपालाल बेसावध असल्याचे पाहुन मागे बसलेल्या आकाश गांगुर्डे याने त्याचे बॅगमधुन चॉपर काढुन चंपालाल याचे गळयावर वार केला, चंपालालने विरोध केल्याने आरोपी रमेश सोनवणे याने आकाश याचेकडुन चॉपर हातात घेवुन मयत चंपालाल याचे डोक्यावर सपासप वार करून जिवे ठार मारले, तसेच चंपालाल याचा मृतदेह गाडीचे बाहेर काढुन बाजुचे चारीमध्ये टाकला व आकाश गांगुर्डे याने सोबत आणलेल्या बाटलीतील पेट्रोल मृतदेहावर टाकुन पेटवुन दिले असल्याची कबुली दिली असुन आरोपी कैलास पुणेकर (मयताचे पत्नीचा भाउ) हा त्यांना घेण्यासाठी उगाव येथे गेला व तेथुन ते सर्वजण ओझर येथे परत आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

वरील गुन्हयात **आरोपी नामे १) रमेश साहेबराव सोनवणे, वय २६,** रा. समतानगर, ओझर **२) आकाश शंकर गांगुर्डे,** वय १९, रा. मुल्लावाडा, ओझर, **३) संजय कारभारी बाविस्कर,** वय ४२, रा. समतानगर, ओझर तसेच मयताची पत्नी हिचा भाउ नामे **४) कैलास भिला पुणेकर,** वय ५५, रा. जेलरोड, नाशिकरोड, ५) निर्मला उर्फ ज्योती चंपालाल जाट (मयताची पत्नी), रा. श्रमिक नगर, ओझर यांना ताब्यात घेतले असुन निफाड पोलीस ठाणेस हजर करण्यात आले आहे. सदर प्रकरणात आरोपी रमेश सोनवणे याचे मयताचे पत्नीशी अनैतिक संबंध असल्याने पत्नी निर्मला हिस मयत हा नेहमी त्रास देत असल्याचे कारणावरून वरील सर्व आरोपीतांनी एकत्रितरित्या प्लॅन बनवुन खुन केला असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने अत्यंत चिकाटी व कौशल्यपुर्ण तपास करून सदर खुनाचा गुन्हा उघडकीस आलेला आहे. याबाबत **मा. पोलीस अधीक्षक, श्री. संजय दराडे, सो** यांनी तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन करुन केलेल्या चांगल्या कामगिरी बाबत १०,०००/- रुपयाचे बक्षिस जाहिर केले आहे. सदर गुन्हयात **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे**, सपोनि श्री.**आशिष आडसुळ**, सपोनि श्री. **राम करपे,** सपोउनि रविंद्र शिलावट, जिवराज इलग, पोहवा मुनिर सैय्यद, भगवान निकम, कैलास देशमुख, पोना राजु सांगळे, नंदु काळे, पोकॉ रवि टर्ले, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम, संदिप लगड अशा पथकाने सदर खुनाचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे.